Hyderabad (Sind) National Collegiate Board's
KISHINCHAND CHELLARAM LAW COLLEGE
(ACCREDITED GRADE 'A' BY UGC-NAAC)

Dr. Kavita Lalchandani
B.Sc., LL.M., NET, Ph.D.
Principal

October 29, 2026

NOTICE FOR STUDENTS ADMITTED IN THE ACADEMIC YEAR 2026-2027

Students are informed that online applications are invited regarding the implementation of scholarship schemes administered by the Directorate of Higher Education for the academic year 2026–27 through the MahaDBT Portal using the online mode.

Interested students can apply on http://mahadbt2.maharashtra.gov.in portal.

Detailed information and instructions about various Schemes, along with the necessary documents required is mentined in the attached circular.

By Order

Vidyasagar Prin. K. M. Kudnani Chowk, 123, Dinshaw Wachha Road, Churchgate, Mumbai – 400020
Tel: no.: 022-22822376 . Mob. No.+918591065787 . Email: info@kclawhsnc.edu.in . Website: www.kclawhsnc.edu.in

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६
Web-ww.dhepune.gov.in फोन नं.०२०/ २९७०७०९८ E-Mail : schol.dhepune@gov.in

जा.क्र.: उशिसं/शिष्यवृत्ती/२६-२७/ई -१९९०१७४ दि. /१०/२०२६.

परिपत्रक

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

विषय - **उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांची सन २०२६-२७ करीता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय विषयी कळविण्यात येते की, महाडीबीटी पोर्टल २.० सुरू झाले असून सदर पोर्टलवर शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी आपल्या अधिनस्त असणाऱ्या सर्व कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विना अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना कळविण्यात यावे.

राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहे. सन **२०२६-२७** करीता महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून दिनांक १/६/२०२६ पासूनऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या खालील १७ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

अ.क्र.	योजनांची नावे
१	राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२	डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३	एकलव्य आर्थिक सहाय्य
४	गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर)
५	गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर)
६	राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती
७	शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती
८	जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती
९	राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती
१०	गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती
११	शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती
१२	राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती(भाग-२)
१३	माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य
१४	स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य
१५	राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना- SEBC
१६	डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना - SEBC
१७	राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती -मुलींना मोफत

१. उपरोक्त शिष्यवृत्तीसाठी http://mahadbt2.maharashtra.gov.in या लिंकवर महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

२. शिष्यवृत्तीचे शासन निर्णय अटी-शर्ती देय लाभ यांचे अवलोकन करुन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा.

३. उपरोक्त शिष्यवृत्तीबाबत अद्ययावत माहितीसाठी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करावे.

४. विद्यार्थी डी.बी.टी.पोर्टलद्वारे लागू असलेल्या एकापेक्षा अधिक शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरु शकतात तथापि संबंधित विद्यार्थ्यांस त्यांनी निवडलेल्या Preference नुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार असल्याने शिष्यवृत्तीचा Preference काळजीपूर्वक नोंदविण्यात यावा.

५. विद्यार्थ्यांना अर्जासोबत शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

६. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये गुण नोंदवितांना ते टक्केवारी (%) मध्ये नोंदविणे आवश्यक आहे. संच निर्धारित असलेल्या शिष्यवृतीसाठी लाभार्थ्यांची निवड शिष्यवृत्तींच्या अटीनुसार (उदा. टक्केवारी, उत्पन्न इ.) करण्यात येते.

७. शिष्यवृत्तीसाठी आधार क्रमांकाचा वापर करुन अर्ज भरता येतो. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा होणार आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्न करणे आवश्यक आहे.

८. ऑनलाईन अर्ज भरतांना काही अडचणी निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घेण्यात यावा.

९. अर्ज भरतांना काही अडचणी निर्माण झाल्यास महाविद्यालय/संस्थेने नोडल अधिकारी यांचेशी संपर्क साधून अचूक अर्ज भरावा. (महाविद्यालय/संस्थेने नियुक्त केलेल्या नोडल अधिकारी यांची यादी उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.)

१०. विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरतांना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे अचूक भरुन ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आपल्या महाविद्यालयांकडे पुढील कार्यवाही करीता सादर करावी.